

# पहिले पान

संपादक : डॉ. रेखा जगनाळे

2022 ते 2023




सौ. अनिषा दुरगकर
टंकलेखन

सुविचार : –

तुमचा आजच्या संघर्ष तुमच्यात उद्यायाचे सामर्थ्य निर्माण करतो त्यामुळे विचार बदला म्हणजे तुमचे आयुष्य बदलेल.

Institution has developed its vision and mission.

**Vision :**

"Determined for excellence in Social Work Education".

**Mission :**


We at BPNISW shall work continuously to achieve-

1. To impart quality social work education 2 To introduce newer areas of academic pursuit with grater employability potential
3 To introduce core values of higher education with a view to bring about holistic development to personality
4 Providing Social Work Education for both personal and social transformation
5 Providing means for the up-gradation of skills in order to increase the employability of the college students.

## Core values:

- An unwavering faith in Human dignity
- An abiding faith in duty towards other individuals and society

## महाविद्यालयामध्ये योग दिन साजरा:—





दि. २१ जुन २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाकडून ८ वा जागतिक योगदिनानिमित्ताने महाविद्यालयामध्ये योग दिन साजरा करण्यात आला. योगाचे महत्व व जीवनामध्ये त्याचे नियमित पालन केल्याने जीवन 'आयुष्य वाढ़ते, चयापचय सुधारते त्यामुळे शरीर सुदृढ़ होते. याकारणाांनी जीवनात जर योग नियमित केले तर जीवन जगतांना सकारात्मकता वाढ़ते असा संदेश या कार्याक्रमातून देण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे आणि महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

## 'छत्रपती शाहु महाराज' यांच्या जयंतीचा कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न :—


दि. २६ जुन २०२२ ला 'छत्रपती शाहु महाराज' यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी केली जाते.

त्या निमित्याने महाविद्यालयामध्ये 'छत्रपती शाहु महाराज' यांचा जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला.




याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे, डॉ. नंदा पागुळ यांच्या हस्ते प्रतिमेला माल्यार्पण करुन 'छत्रपती शाहु महाराज' यांच्या कार्याप्रती प्रबोधन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' यांच्या १०३ वी जयंती आणि लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्ताने महाविद्यालयात कार्यक्रम:—




दि. १ ऑगस्ट २०२२ ला आयोजित करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे, नागरिक शिक्षण मंडळाचे कार्यकारिणी सदस्य डॉ. दिलीप बारहाते यांनी या थोर पुरुषांच्या प्रतिमेला माल्यापण केले आणि यांच्या कार्यावर प्रकाश टाकून उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक आणि आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने दि. ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये महाविद्यालयात कार्यक्रम :—

श्री भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि केंद्र सरकार, राज्य शासनाच्या आणि समाजकल्याण परिपत्रकान्वये भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचा पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्याने दि. ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये हर घर तिरंगा या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये श्रमदान, रक्षाबंधन कार्यक्रम, तिरंगा वाटप महोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वृक्षरोपन, रूग्णालयामध्ये फळवाटप इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



## महाविद्यालयातील परिसरामध्ये श्रमदानाचा कार्यक्रम:—

दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील परिसरामध्ये श्रमदानाचा कार्यक्रम राबविण्यात आला. त्याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे, रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे व डॉ. पवन येवतकर, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री रवीन्द्र खाडे, श्री मोहन धापोडकर, श्री मुकेश कुलदिप आणि बी. एस.डब्ल्यू पाचवे व प्रथम सेमेस्टर मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन महाविद्यालयातील परिसरामध्ये श्रमदान करण्यात आला. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.





स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव प्रसंगी दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयामध्ये ‘हर घर झंडा’ या उपक्रमातून तिरंगा महोत्सव आणि तिरंगा वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचा प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांच्या हस्ते महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थींनी तिरंगाचे वितरण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत घेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी ‘हर घर तिरंगा’ या कार्यक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले आणि १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधी स्वत:च्या घरी तिरंगा लावण्याचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहित केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे, डॉ. पवन येवतकर आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी—विद्यार्थींनी मोठया संख्येने उपस्थित होते.

## महाविद्यालयातील परिसरामध्ये रक्षाबंधन कार्यक्रम:—



दि. ११ ऑगस्ट २०२२ रोजी रक्षाबंधन कार्यक्रमाच्या निमित्याने रासेयो डॉ. विलास घोडे व डॉ. पवन येवतकर आणि महाविद्यालयातील बी.एस.डब्ल्यू. पाचवे सेमेस्टर मधील १० विद्यार्थी मिळून सकाळी ११.०० ला महाराष्ट्र राज्य कामगार सोसायटी रूग्नालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. मीना देशमुख कार्यालय अधिक्षक श्री विजय गोडे यांना भेटून रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये रूग्णालयातील डॉ. मीना देशमुख, श्री विजय गोडे, डॉ. अल्का जोगेवार, डॉ. वैशाली व्यवहारे, वॉर्ड बॉय यांना विद्यार्थ्यांच्या हस्ते राखी बांधण्यात येऊन आर्शीवाद, सद्भावना व्यक्त करण्यात आली त्यानंतर डॉ. सौ. मीना देशमूख, श्री विजय गोडे आणि रूग्णालयातील सर्व कर्मचारी यांना स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्याने ‘हर घर तिरंगा’ उपक्रमातून तिरंगाचे वाटप करण्यात येवून तिरंगा महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाध्ये रूग्णालयातील सर्व डॉक्टर्स तसे नर्स आणि कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

## महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्याने निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित:—

दि. १३ ऑगस्ट २०२२ ला महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्याने निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या निबंध स्पर्धामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये महापुरूषांचे योगदान या विषयावर निबंध लिहिण्यासाठी विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील शर्वरी पाटील, अनुष्का ठवरे, खुशी खेरडे या विद्यार्थींनी सहभाग घेतला. व चित्रकला स्पर्धेत साक्षी देवतळे, वैष्णवी काळे, विशाल मडकामी या विद्यार्थींनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सहभागी घेतलेल्या विद्यार्थ्यांमधून निबंध स्पर्धेत विशाल मडकामी याला प्रथम क्रमांक आणि चित्रकला स्पर्धेत वैष्णवी काळे हिला प्रथम क्रमांक देण्यात आला. हया स्पर्धेचे आयोजक महाविद्यालयातील डॉ. नंदा पांगुळ आणि डॉ. रेखा जगनाळे यांनी केले.

## भारतीय स्वातंत्र्याचा ७५ व्या वर्धापण दिननिमीत्याने महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित:—

दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ८.३० वाजता भारतीय स्वातंत्र्याचा ७५ व्या वर्धापण दिना निमीत्याने महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी राष्ट्रगीत म्हणून ध्वजारोहण दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी संविधान प्रस्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थ्यांचे भाषण तसेच देशभक्ती गीत, देशातील थोर पुरूषांची विद्यार्थ्यांनी वेशभूषा घेवुन कार्यक्रम सादर केला. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्व आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सामुहीक वंदेमातरम म्हणून कार्यक्रमाचा शेवट केला.

या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'महात्मा गांधी जयंती' आणि 'माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती' साजरी :—

दि. ०२ ऑक्टोबर २०२२ ला आली. तसेच महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी राष्ट्रपिता 'महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला प्रतिमेला माल्यार्पण केल. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे व व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुष्पाजंली अर्पण करून अभिवादन केले. प्रस्तुत कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या सामाजिक कार्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन कले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## महाविद्यालयात पारशी नुतन दिन निमित्याने वृक्षरोपन व संकलीत बीजारोपन कार्यक्रम



दि. १६ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ११.३० वाजता घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेवून कार्य केले. वृक्षरोपन व संकलीत बीजारोपन कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी व रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे आणि डॉ. पवन येवतकर उपस्थित होते.

पारशी नुतन दिन निमित्याने वृक्षरोपन व संकलीत बीजारोपन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेवून कार्य केले. वृक्षारोपण व संकलीत बीजारोपण कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी व रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे आणि डॉ. पवन येवतकर उपस्थित होते.

**स्वातंत्र्याचा अमृत उत्सव या निमित्याने श्रमदान व विद्यार्थ्यांकरिता लसीकरणाचा कार्यक्रमः—**

दि. १७ ऑगस्ट २०२२ रोजी ११.०० वाजता महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे आणि सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सामुहिक राष्ट्रगीत म्हटले. त्यानंतर स्वातंत्र्याचा अमृत उत्सव या निमित्ताने श्रमदान व विद्यार्थ्यांकरिता लसीकरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी लसीकरण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कामगार सोसायटी रूग्णालयातील सर्व रूग्णांना फळ वाटप केले.

अशा प्रकारे स्वांतत्र्याचा अमृत महोत्सव निमित्याने महाविद्यालयात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. यामध्ये सर्व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले.




**राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने 'डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण जयंती दिवस' महाविद्यालयात शिक्षक दिन म्हणून साजरा :—**

दि. ६ सप्टेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने 'डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण जयंती दिवस' महाविद्यालयात शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे कार्यक्रमाला उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ विलास घोडे यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.



**राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने NSS FOUNDATION DAY' कार्यकम आयोजित करण्यातः—**


दि. **24 सप्टेंबर 2022 ला** राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने NSS FOUNDATION DAY कार्यकम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ विलास घोडे आणि डॉ. नंदा पांगुळ उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी रासेयो उपक्रमातुन विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व विकास करावा असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. डॉ. विलास घोडे यांनी रासेयो चे उददेष, महाविद्यालयाचे नियमित कार्यक्रम, विषेष ग्रामीण षिबिर, रा.से.यो.चे गुण इत्यादी विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी रासेयो उपक्रमातून कृतिषील आणि कर्तृत्ववान आणि सामाजिक बांधिलकीचे गुण विकसित करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील 125 स्वयंसेवक उपस्थित होते.

## डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीच्या निमित्ताने 'ग्रंथपाल दिवस साजरा :—

स्व. ईश्वर देशमुख मेमोरियल ग्रंथालय येथे दि. 13/08/2022 ला **डॉ. एस. आर. रंगनाथन** यांच्या **जयंतीच्या** निमित्ताने '**ग्रंथपाल दिवस** साजरा करण्यात आला. **महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे** प्रमुख अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व केंद्रप्रमुख डॉ. विजय खंडाळ (केंद्रप्रमुख ज्ञानस्त्रोत केंद्र, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर) उपस्थित होते. सरांनी प्रथम दिप प्रज्वलन करून **डॉ.एस.आर. रंगनाथन** यांचा प्रतिमेस माल्यापर्ण केले. त्यानंतर स्वागत गीत सादर करण्यात आले.
डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी प्रास्ताविक सादर केले आणि पाहुण्यांचे परिचय करून दिले. त्यांनी डॉ. रंगनाथन यांच्या सखोल परिचय करून दिला व महाविद्यालयात ग्रंथालयाचे महत्व याविषयावर त्यांनी प्रकाश टाकला. डॉ. विजय खंडाळ यांनी डॉ. रंगनाथन यांच्यावर थोडक्यात भाषण करून त्यांनी सांगितलेल्या ग्रंथालय शास्त्राचे पाच सूत्र या वर प्रकाश टाकला. आणि आजच्या काळ तंत्रज्ञापाचा असून सुद्वा 65 वर्षापूर्वी सूत्रे आजच्या या तांत्रिक काळात जशास तशी लागू होतात. हे त्यांनी उदाहणासहित विद्यार्थ्यांना सांगितले. त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनंत बरडे यांनी विद्यार्थी व ग्रंथालय यांच जवळच नातं कसं असतं व कसा असायला पाहिजे ते सांगितले. त्याच प्रमाणे त्यांनी डॉ. रंगनाथन यांनी सुरू केलेल्या चळवळी मुळेच आज ग्रंथपालाचे चांगले दिवस आले असे त्यांनी आपल्या भाषणातून विशद केले. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था असून समाजाचा हितासाठी ग्रंथालयाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे जतन करणारा ग्रंथपाल ही तितकच महत्वाचा घटक आहे. ज्याप्रमाणे वाचकांचा गरजा वाढ़तात, बदलतात त्याचप्रमाणे ग्रंथपालनात बदल होणे काळाची गरज आहे. म्हणून आजच्या काळानूसार ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे गरजे आहे असे विचार डॉ. बरडे यांनी आपल्या भाषणात मांडले.

डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी संचालन व प्रस्ताविक सादर केले. आभार प्रदर्शन श्री. कमलाकर ढ़बाले यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. नंदा पांगुळ, डॉ. विलास घोडे, डॉ. सिमा लोबो, डॉ. रेखा जगनाळे, श्री. रूपेश ढाले, श्री. कमलाकर ढबाले, श्री. सत्यवान रामटेके, आणि इतर कर्मचारी व 38 विद्यार्थी उपस्थित होते.





## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'जागतिक आदिवासी दिन' साजरा:—

दि. १५ नोव्हेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'जागतिक आदिवासी दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी 'क्रांतीकारी बिरसा मुंडा' यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. आणि आदिवासीच्या कल्याण व विकासासाठी केलेले कार्य यावर माहिती दिली.

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी सुत्र संचालन आणि आभार व्यक्त केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## बाल लैंगिक अत्याचार काळजी व संरक्षण :

कैलास सत्यार्थि चिल्ड्रेन फाउन्डेशन, नवी दिल्ली 'बचपन बचाओ आंदोलन' अंतर्गत महिमा बहुउद्देशिय सामाजिक संस्था नागपूर तर्फे महाविद्यालयात बाल लैंगिक अत्याचार काळजी व संरक्षण कार्यक्रमाचे दि.०५/०९/२०२२ रोजी आयोजन करण्यात आले. यात अध्यक्ष म्हणून डॉ. नंदा पांगूळ तर प्रमूख अतिथी म्हणून शितल पाटील, जिल्हा समन्वयक कैलास सत्यार्थि चिल्ड्रेन फाउन्डेशन, वर्षा पाटील व राणी कळमकर उपस्थित होत्या. शितल पाटील यांनी त्यांच्या संस्थेच्या कामाबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रश्नात संवेदनशील राहण्याचे आवाहान केले. राणी कळमकर यांनी बाल संरक्षण अधिनियमाची माहिती दिली. तर वर्षा पाटील यांनी अनेक उदाहरणासहित या प्रश्नाचे गांर्भीय विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. नंदा पांगुळ यांनी बाल लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात समाजकार्यकर्त्याची भुमिका किती महत्वाची आहे. व या संदर्भात काय करायला पाहिजे यावर प्रकाश टाकला.

प्रस्तूत कार्यक्रमासाठी ५६ विद्यार्थींनी व २४ विद्यार्थी उपस्थित होते.





## म्हाविद्यालयात १४ नोव्हेंबर २०२२ बालक दिन साजरा:





बाल दिनाच्या औचित्य साधून महाविद्यालयामध्ये "बालकांचे अधिकार" या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आशिष नन्नावरे होते. तर प्रमूख पाहूणे म्हणून सागर गांगुर्डे आणि संदिप चकाटे उपस्थित होते. डॉ. नंदा पांगूळ यांनी बालकाच्या समस्या, त्यांची सद्यस्थिती आणि बालकांचे अधिकार यावर प्रकाश टाकला. अडचणीत सापडलेली बालके कुठे कुठे राहू शकते यावर त्यांनी मार्गदर्शन केले. करिना चव्हान यांनी बालक दिनाच्या संदर्भात बालकांची सद्यस्थिती कशी आहे याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. सागर गांगुर्डे यांनी अडचणीत सापडलेल्या बालकांच्या संदर्भात विविध उदाहरणे देउन बालकांच्या समस्या स्पष्ट केल्या संदिप चकाटे यांनी बालक दिनाचे महत्व सांगुन बालकाच्या विकासामध्ये समाजकार्यकत्याची भुमिका मांडली कार्यक्रमाचे अध्यक्ष आशिष नन्नावरे यांनी बालकांच्या विकासात संस्कार कसे महत्वाचे आहे हे यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. नंदा पांगुळ यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी ६३ विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने माजी राष्टपती डॉ. अब्दुल कलाम यांची महाविद्यालयात ९१ वी जयंती साजरी:–

दि. १५ ऑक्टोबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने माजी राष्टपती डॉ. अब्दुल कलाम यांची महाविद्यालयात ९१ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रम निमित्याने महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांनी केलेल्या देश सेवेप्रती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनंत बरडे हजर होते. त्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांचा प्रतिमेस माल्यार्पण करून वाचन प्रेरणा दिन साजरा करण्या मागचा उददेश्य सांगितला. ते म्हणाले की, डॉ. कलाम यांचे लेखन स्फुर्तीदायी आहे. त्यामुळे महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ कलाम यांची पुस्तके वाचावित, त्याचबरोबर इतर साहित्यांचेही जास्तीत जास्त वाचन करावे. आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन केले जात आहे.

या निमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनी आयोजित केली होती.

ग्रंथपाल डॉ. पौर्णिमा गंथडे यांनी डॉ. कलामांनी लिहलेल्या ग्रंथाचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. कमलाकर ढबाले यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. शर्मिला दरणे यांनी केले.




## महाविद्यालयात 'संविधान दिन' साजरा करण्यात:–



दि. २६ नोव्हेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी संविधान दिना निमित्त भव्य रॅली समाजकल्याण विभाग नागपूर येथुन काढण्यात आली या रॅलीमध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## १६ नोव्हेंबर २०२२ बाल लैंगिक शोषण आणि चाईल्ड लाइनची भुमिका :



प्रस्तुत कार्यक्रम चाईल्ड लाइन द्वारा आयोजित केला गेला. चाइल्ड लाइनच्या डायरेक्टर श्रीमती खेडीकर यांनी चाईल्ड लाइन संदर्भात संपूर्ण माहिती देउन बाल लैंगिक शोषण कुठे कसे होवु शकते तसेच त्यावर काय उपाय करायला पाहिजे यावर सविस्तर पीपीटी द्वारा मार्गदर्शन केले. पथनाटयाच्या माध्यमातुन बालकांचे लैंगिक शोषण कसे होते व त्यावर काय उपाय करायला पाहिजे हे दाखविले गेले. तसेच या कार्यक्रमात लैंगिक शोषण चे स्वरूप व काळजी कशी घ्यायची हे दाखविणारी "कोमल" चित्रफित दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी बाल लैंगिक शोषणवर प्रकाश टाकला तसेच प्रस्तुत कार्यक्रम आयजित केल्याबददल चाईल्ड लाइनच्या संपूर्ण टिमचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. नंदा पांगुळ यांनी केले.

आभार प्रदर्शन आकाश केदार यांनी मानले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी ६१ विद्यार्थी उपस्थित होते.

**'संत गाडगे महाराज' पुण्यतिथि कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित:–**

दि. २० डिसेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'संत गाडगे महाराज' पुण्यतिथि कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. नंदा पांगुळ यांनी संत गाडगे महाराज यांच्या जीवनशैली आणि समाजसुधारक विचारावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनंत बरडे यांनी संत गाडगे महाराजांचा समाज कार्याप्रती अंधश्रध्दा, स्वच्छता आणि वैज्ञानिक दुष्टिकोनासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची प्रास्तविक, सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रमाचे अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील मोठया संख्येने सहभागी झाले होते.



**राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'हुतात्मा दिन' व 'महात्मा गांधी यांची पुण्यतिथी' महाविद्यालयात साजरी:–**



दि. ३० जानेवारी २०२३ दूपारी २.३० वा. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'हुतात्मा दिन' व 'महात्मा गांधी यांची पुण्यतिथी' महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यल्याचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी महात्मा गांधीजींच्या प्रतिमेला माल्यार्पण केले आणि महात्मा गांधी यांच्या कार्याप्रती मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यी सभागृहात उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत १०८ व्या इंडियन नॅशनल कॉंग्रेस आयोजनाचे प्रसार :–**

दि. ०२ जानेवारी २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत १०८ व्या इंडियन नॅशनल कॉंग्रेस आयोजनाचे प्रसार करण्यासाठी विज्ञान ज्योत आणि बाईक रॅली मध्ये महाविद्यालयातील रासेयो अधिकारी विलास घोडे आणि २५ विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते.

**महाविद्यालयात ७४ वां 'गणतंत्र दिवस' साजरा :–**

दि. 26/01/2023 ला महाविद्यालयात ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी **ध्वजारोहण** केला. त्यानंतर प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त्याने काही विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेतून भारत मातेचे व भारतमातेच्या सुपुत्राचे अर्शन घडविले आणि त्यांच्या बलिदानाविषयी स्मृति जागी केली. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी प्रजासत्ताक दिना विषयी माहिती देवून विद्यार्थ्यांना उदबोधन केले. या प्रसंगी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी ध्वजेला सलामी दिली. त्यानंतर वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त्याने महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजनः—

दि. ०३ जानेवारी २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त्याने महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे, डॉ. नंदा पांगुळ व्यासपिठावर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील वरीष्ठ प्राध्यापिका डॉ. नंदा पांगुळ यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. बरडे डॉ. विलास घोडे डॉ. रेखा जगनाळे, डॉ.लोबो, डॉ. गंथडे शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही सावित्रीबाई च्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या कार्याप्रती विचार व्यक्त केले. डॉ. नंदा पांगुळ यांनीही सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनंत बरडे यांनीही क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## महाविद्यालयात 'स्वामी विवेकानंद' यांची १६० वी जयंती निमित्याने 'राष्ट्रीय युवा दिन' आणि 'राजमाता जिजाऊ' यांची जयंतीचा कार्यक्रम आयोजितः—



दि. १२ जानेवारी २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात 'स्वामी विवेकानंद' यांची १६० वी जयंती निमित्याने 'राष्ट्रीय युवा दिन' आणि 'राजमाता जिजाऊ' यांची जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे व्यासपिठावर उपस्थित होते. डॉ. अनंत बरडे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. स्वामी विवेकानंद हे युवकांचे प्रेरणा स्त्रोत असून देशाच्या विकासामध्ये युवकांचे महत्व व योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. नंदा पांगुळ यांनी युवक आणि युवतींनी सामाजिक बांधिलकीसाठी थोर महात्म्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आणि छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्यासाठी राजमाता जिजाऊ यांनी दिलेले योगदान आणि परिश्रम यांवर माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## 'छत्रपती शिवाजी महाराज' जयंती चा कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित

दि. १९ फेब्रुवारी २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज' जयंती चा कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनपट विद्यार्थ्यासमोर व्यक्त केले. तसेच त्यांच्या कार्यातुन प्रेरणा घेवून कला गुण कौशल्य व व्यवस्थापनाचा विकास करावा असे आवहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## 'श्रध्देय स्वातंत्र्य सेनानी ॲड. स्व.ईश्वरबाबूजी देशमुख यांच्या 17 व्या स्मृतीदिनप्रित्यर्थ कार्यक्रमः—




**दि. 6/02/2023** ला महाविद्यालयात रक्तदान शिबिर, रस्ता सुरक्षा पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्वाक्षरी अभियान, वृक्षरोपण, आरोग्य तपासणी शिबिर, पुस्तकाचे विमोचन, स्व. बाबुजींच्या आठवणी इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला स्व. ॲड. ईश्वरबाबू देशमुख यांच्या प्रतिमेला नागरिक शिक्षण मंडळाचे सहसचिव श्री रमेशजी दुरूगकर, श्री श्यामभाऊ देऊळकर, श्री निलेषजी उकुंडे, सौ गहलोत मॅडम, श्रीमती कानतोडे मॅडम, श्री पृथ्वीराजजी डेहनकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंनत बरडे यांनी बाबुजींच्या प्रतिमेला माल्यार्पण केले आणि युनायटेड वे मुबंई या संस्थेचे प्रकल्प समन्वयक श्री कृणाल वासू आणि महाविद्यालयातील षिक्षक व षिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्पांजली व श्रध्दाजंली अर्पण करून महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.या शिबिरामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे, महेन्द्र ठोबंरे, गौरव ठाकरे, खुशाल गायकवाड, सागर गागुंर्डे, शुभम दहीवलकर, तुषार कांबळे, अंकित दुर्गे, ज्ञानेश्वर नरोटी जवळपास 20 विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. तसेच महाविद्यालयामध्ये आरोग्य तपासणी षिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नेत्र तपासणी, दंत तपासणी, बी. पी., शुगर तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी इ. तपासण्या करण्यात आल्या. या शिबीरामध्ये महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आरोग्य तपासण्या करून सहकार्य केले. महाविद्यायातील वृक्षरोपण कार्यक्रमामध्ये नागरिक शिक्षण मंडळाचे सहसचिव श्री रमेशजी दुरूगकर यांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले. तसेच नागरिक शिक्षण मंडळाचे सदस्य श्री श्यामभाऊ देऊळकर, श्री निलेशजी उकुंडे, सौ अमिताताई गहलोत, श्रीमती निर्मलाताई कानतोडे, श्री पृथ्वीराजजी डेहनकर यांच्या हस्तेही महाविद्यालयात वृक्षरोपण करण्यात आले. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अंनत बरडे, रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे व डॉ. पवन येवतकर आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यी स्वाक्षरी मोहिमेमध्ये मोठया प्रमाणात सहभागी झाले. रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमामध्ये Respect the stop line यावर स्वाक्षरी अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये नागरिक शिक्षण मंडळाचे सहसचिव श्री रमेशजी दुरूगकर यांच्या हस्ते स्वाक्षरी मोहिम अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच नागरिक शिक्षण मंडळाचे सदस्य श्री श्यामभाऊ देऊळकर, श्री निलेशजी उकुंडे, सौ गहलोत मॅडम, श्रीमती कानतोडे मॅडम, श्री डेहनकरजी स्वाक्षरी मोहिममध्ये भाग घेतला. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अंनत बरडे, रासेयो अधिकारी डॉ. विलास घोडे व डॉ. पवन येवतकर आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी मोहिमेमध्ये सहभागी झाले.

स्व. ईश्वर देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्याने आयोजित कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युनायटेड व मुबंई येथील संस्थेचे समन्वयक श्री कृणाल वासू आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बरडे, डॉ. घोडे, डॉ. पांगुळ, डॉ. सरगर, डॉ. लोबो, डॉ. जगनाडे, डॉ. येवतकर, डॉ. डाखोळे सौ. टुले, सौ. दरणे, सौ. दुरगकर, सौ. देशमुख, श्री रामटेके, श्री ढबाले, श्री ढाले, श्री खाडे, श्री. वागदे, श्री धापोडकर, श्री तिजारे, श्री कुलदिप, श्री ठोंबरे आणि महाविद्यालयातील बी. एस डब्ल्यू व एम. एस डब्ल्यू मधील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले.




## ‘संत गाडगे महाराज’ यांच्या जयंतीचा कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित:—

दि. २१ फेब्रुवारी २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ‘संत गाडगे महाराज’ यांच्या जयंतीचा कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे व्यासपिठावर उपस्थित होते.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी संत गाडगे महाराज यांनी अंधश्रध्दा, स्वच्छता आणि समाजपरिवर्तनासाठी केलेल्या कार्यासंबंधी माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास घोडे यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

## महाविद्यालयात समुपदेशन कार्यशाळा संपन्न :—

दि. 01/03/023 रोजी महाविद्यालयात समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेला कौटुंबिक न्यायालयातील विवाह समुपदेशक डॉ. स्मिता जोशी उपस्थित होत्या त्यांनी प्रस्तुत कार्यशाळेमध्ये विविध उपक्रम घेतलेव समुपदेशकाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनंत बरडे यांनी स्वागत पर भाषण केले. समुपदेशन कार्यशाळा हासर्टिफिकेट कोर्स इन काउसिंलिंग कोर्स Bsw व Msw च्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले.

या कार्यक्रमाच्या आयोजिका व समुपदेशन अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. लख्मी डाखोळे यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठया संख्येने सहभागी झाले होते.



## महाविद्यालयात ‘मराठी भाषा गौरव दिन’ निमित्ताने कार्यक्रम संपन्न :—



दि. 27/02/023 रोजी महाविद्यालयात ‘मराठी भाषा गौरव दिन’ निमित्ताने कार्यक्रम घेण्यात आला. प्रस्तुत कार्यक्रमाला व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डडॉ. अनंत बरडे, पमुख पाहुणे डॉ. राष्ट्रपाल मेश्राम (कामठी कॉलेज आफॅ सोशल वर्क,) डॉ. नंदा पांगुळ उपस्थित होत्या. या प्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित राहलेल्या प्रमुख पाहुण्यांनी कवि कुसुमरग्रज यांच्या जन्मदिनानिमित्ताने संपूर्ण जगभर साजरा करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिना निमित्ताने औचित्यपूर्ण उदबोधन केले. त्याच बरोबर **‘‘मराठीचे व्याकरण’’** याविषयी विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण असे प्रात्याक्षिकवर माहिती दिली व मराठी भाषेच्या विकासात व्याकरणाचे महत्व जाणून विद्यार्थ्यांनी व्याकरण अंगीकृत केले पाहिजे असे सांगितले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ अनंत बरडे यांनी मराठी भाषा दिन साजरा करण्यामागच्या उद्देश स्पष्ट केला. या कार्यक्रमाचा आयोजन कार्यक्रम समन्वयक डॉ. रेखा जगनाळे यांनी केला तर आभार प्रदर्शन डॉ. पवन येवतकर यांनी केले.

महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

Dr. A. S. Barde
Officiating Principal
B. P. National Institute of Social Work
Hanuman, Nagar, Nagpur.